# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः24.08.2024** **वारःशनिवार**

---

1. इस्रोनं अंतरिक्ष क्षेत्राबरोबरच देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासातही महत्त्वाचं योगदान दिल्याचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे गौरवोद्गार
2. लाडकी बहीण योजनेसह सुरक्षित बहीण योजनाही राबवण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही
3. महाराष्ट्र बंदला मुंबई उच्च न्यायालयाची मनाई, महाविकास आघाडीकडून आजचा 'बंद' मागे घेतल्याची घोषणा आणि
4. नेपाळमध्ये बस नदीत पडून झालेल्या अपघातात राज्यातल्या जळगाव जिल्ह्यातील 24 जणांचा मृत्यू

**राष्ट्रपती**

भारतीय अंतरिक्ष संशोधन संस्था, इस्रोनं केवळ अंतरिक्ष क्षेत्रातच नाही तर देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासातही महत्त्वाचं योगदान दिलं आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल काढले. पहिल्या राष्ट्रीय अंतरिक्ष दिनानिमित्त नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात त्या काल बोलत होत्या. केंद्रीय राज्य मंत्री जितेंद्र सिंग आणि इस्रोचे अध्यक्ष एस सोमनाथ यावेळी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते इस्रोच्या रोबोटिक चॅलेंज आणि भारतीय अंतरिक्ष हॅकेथॉनच्या विजेत्यांना परितोषिकं प्रदान करण्यात आली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे देशवासियांना पहिल्या राष्ट्रीय अंतरिक्ष दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

**अंतरिक्ष दिन-सोलापूर**

राष्ट्रीय अंतरिक्ष दिनानिमित्त देशभरात सर्वत्र काल विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. सोलपूरमध्ये केंद्रीय संचार ब्युरो, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि सोलापूर विज्ञान केंद्रानं काल एक प्रदर्शन भरवलं होतं. बैलगाडी आणि सायकलपासून सुरुवात करत, चंद्रयान-3 मोहीम यशस्वी करणाऱ्या इस्रोचा प्रवास अतिशय थक्क करणारा आहे; तसंच अंतराळ संशोधक आणि भारतीयांसाठी प्रेरणादायी आहे; असं विद्यापीठाचे कुलगुरू डॉ प्रकाश महानवर यावेळी म्हणाले.

**चांद्रयान**

लोणावळा इथल्या ॲडवोकेट बापूसाहेब भोंडे हायस्कूल आणि कल्पना चावला स्पेस अँकॅडमीमध्ये एक हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी काल अंतरिक्ष दिनानिमित्त चांद्रयान तीनची प्रतिकृती एकत्रितपणे साकारून नवा विक्रम प्रस्थापित केला, ऐकुया त्याबाबत अधिक माहिती अँकॅडमीचे संचालक डॉ. संजय पुजारी यांच्याकडून......

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून जनतेशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 113 वा भाग असेल.

**मोदी-जळगाव**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या जळगाव इथं येणार आहेत. त्यावेळी 11 लाख लखपती दीदींना त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहेत.

**<u>सुरक्षित बहिण-नाशिक</u>**

लाडकी बहीण योजनेबरोबरच आता सुरक्षित बहीण योजनाही राबवण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल नाशिकमध्ये दिली. राज्य शासनाच्या वतीनं महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत आयोजित महिला महाशिबीरात ते बोलत होते. काटकसरीनं घर चालवणाऱ्या बहिणींना आधार देण्यासाठी सरकारनं लाडकी बहिण योजना राबवली; आगामी विधानसभा निवडणुकीनंतरही लाडकी बहीण योजना सुरू राहील, असं त्यांनी सांगितलं. बदलापूरमधली घटना अत्यंत दुर्दैवी आहे, मात्र, त्यावर होत असलेलं राजकारण त्याहीपेक्षा दुर्दैवी आहे, असं ते म्हणाले.

**<u>उच्च न्यायालय-बंद</u>**

बदलापूर इथं लहान मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी महाविकास आघाडीनं आज महाराष्ट्र बंदची हाक दिली होती; मात्र यासाठी मुंबई उच्च न्यायालयानं काल मनाई केली. महाराष्ट्र बंद विरोधात उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेवर काल सुनावणी झाली. यावेळी, कोणत्याही राजकीय पक्षाला बंद पुकारण्याचा अधिकार नसल्याचं न्यायालयानं स्पष्ट केलं. या प्रकरणी न्यायालयानं महाविकास आघाडीचे घटक पक्ष, राज्य सरकार आणि गृहविभागाला नोटीस बजावली असून त्यात न्यायालयानं दिलेल्या आदेशांचं पालन करण्याचे आदेश दिले आहेत.

न्यायालयाच्या या निर्णयानंतर ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या आवाहनानुसार महाविकास आघाडीनं आज पुकारलेला बंद मागे घेतल्याचं जाहीर केलं. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून बंद मागे घेण्याचं आवाहन केलं होतं. ते आज पुण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर बसून निषेध करणार आहेत. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील या नेत्यांशी चर्चा करून हा निर्णय घेतल्याची माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बातमीदारांना दिली. बंद मागे घेतला तरी काँग्रेसचे कार्यकर्ते विविध ठिकाणी काळ्या फिती लावून आंदोलन करणार असल्याचं पटोले यांनी सांगितलं.

**<u>सोनोवाल-मुंबई</u>**

आत्मनिर्भर भारताच्या उभारणीमध्ये मुंबईची भूमिका मोठी असल्याचं प्रतिपादन केंद्रीय बंदरं, जलवाहतूक आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी काल मुंबईत केलं. मुंबई बंदर प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन सोनोवाल यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. पीर पाऊ इथं थर्ड केमिकल बर्थ, जवाहर द्वीप इथं किनारा संरक्षण आणि पुनर्प्राप्ती प्रकल्प यासह इतर प्रकल्पांचं उद्घाटन सोनोवाल यांच्या हस्ते झालं. तसंच या क्षेत्राशी संबंधित विविध सामंजस्य करारही यावेळी झाले. राष्ट्रीय अंतरिक्ष दिनानिमित्त मुंबई बंदरातल्या सर्व नौकांनी हॉर्न वाजवून सर्व संशोधकांचा सन्मान केला. आपल्या मुंबई भेटीदरम्यान सोनोवाल यांनी पवईच्या सागरी प्रशिक्षण संस्थेलाही भेट दिली. 'एक पेड माँ के नाम' मोहिमेच्या अनुषंगानं संस्थेच्या आयुष वाटिकेमध्ये त्यांनी वृक्षारोपण केलं.

**<u>राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्था</u>**

केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांच्या हस्ते काल मुंबईतल्या राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्थेचं उद्घाटन करण्यात आलं. राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्था साठ वर्षांपासून कौशल्य विकासावर काम करत असून राज्य सरकारची कौशल्य विकासासाठी महत्त्वाची भूमिका असल्याचं चौधरी यांनी यावेळी सांगितलं. जयंत चौधरी यांनी राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्थेतल्या विभागांना भेटी देऊन कार्यप्रणालीचा आढावा सुद्धा घेतला.

**<u>आकांक्षीत जिल्हा-धाराशिव</u>**

निती आयोगाने देशातील 112 जिल्ह्यांची आकांक्षीत जिल्हा म्हणून निवड केली आहे. त्यामध्ये राज्यातील धाराशिव जिल्ह्याचाही समावेश आहे. जिल्हा निर्देशांकामध्ये वाढ व्हावी, यासाठी जिल्हा प्रशासनानं, केंद्रानं आणि राज्य सरकारच्या मदतीनं

केलेल्या विविध उपाय योजनांमुळे धाराशिव जिल्हा देशात तिसरा आला आहे. आरोग्य, पोषण, शिक्षण, कृषी आणि जलस्रोत, आर्थिक समावेश, कौशल्य विकास, मुलभूत सुविधा या सहा निर्देशांकावर यात भर देण्यात आला होता.

**गिफ्टेडनेस-ज्ञानप्रबोधिनी**

अठरावी आशिया प्रशांत प्रज्ञावंतता परिषद जपानमधील ताकामात्सू इथं 17 ते 20 ऑगस्ट दरम्यान झाली. या परिषदेमध्ये विविध देशांतील संशोधक, शिक्षक सहभागी झाले होते. पुण्यातील ज्ञान प्रबोधिनी संस्थेच्या पाच सदस्यांनी या परिषदेमध्ये सात शोधनिबंध आणि एका पोस्टरचं सादरीकरण केलं. यानिमित्तानं प्रज्ञावंतता या विषयांत गेल्या साठपेक्षा अधिक वर्षांमध्ये ज्ञान प्रबोधिनीमध्ये झालेलं काम जागतिक स्तरावर पोहोचलं. डॉ. धनश्री सोवनी, प्रेरणा कारुळकर, ईशा कान्हेरे, मृण्मयी वैशंपायन आणि डॉ. सौगंध देशमुख यांचा या गटात समावेश होता.

**नेपाळ**

नेपाळमध्ये बस नदीत पडून झालेल्या अपघातात 27 जणांचा मृत्यू झाला असून यात राज्यातल्या जळगाव जिल्ह्यातील 24 जणांचा समावेश आहे. या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शोक व्यक्त केला आहे. या अपघातातील मृतदेह तातडीनं महाराष्ट्रात आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि वरीष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधला. हे सर्व मृतदेह वायुसेनेच्या विमानानं आज नाशिक इथं आणण्यात येतील; त्यानंतर ते त्यांच्या कुटुंबियांकडे सोपवण्यात येणार आहेत.

**इशारा-सिंधुदुर्ग**

अरबी समुद्रात वादळसदृश्य स्थिती निर्माण झाल्यामुळे आज मच्छीमारांनी खोल समुद्रात जाऊ नये, असा इशारा हवामान खात्यानं दिला आहे. या पार्श्वभूमीवर गुजरात डहाणूसह शेकडो नौका देवगड बंदरात दाखल झाल्या आहेत. दरम्यान नारळी पौर्णिमेनंतर समुद्रातील मच्छीमारीला खऱ्या अर्थानं सुरुवात झालेली असताना वादळ सदृश्य वातावरण तयार झाल्यामुळे मच्छीमारांचं मोठं नुकसान होण्याची भिती व्यक्त होत आहे.

**पाऊस**

राज्याच्या विविध भागात काल जोरदार पाऊस झाला. धुळे, जळगाव, जालना, परभणी आणि नांदेड जिल्ह्यात काल जोरदार पाऊस झाला.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.